# प्रसिध्दी पत्रक

**आरोपी सुभाष छगनराव भोसले, वय ५५ वर्षे, सहा. पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर यांनी ४०००/- रु लाच स्विकारल्या नंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपी लोकसेवकाचे नांव हुद्दा व पत्ता | :- | सुभाष छगनराव भोसले, वय ५५ वर्षे, सहा. पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे दिनांक | :- | पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| तपासी अधिकारी | :- | श्री. मारुती पंडित, पोलीस उपअधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| लाच रक्कम | :- | ४०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारले |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या विरुद्ध दाखल गुन्ह्यात पोलीस ठाण्यात जामीन देऊन, तक्रारदार यांचा मोबाईल फोन परत देण्यासाठी व गुन्ह्यात मदत करण्यासाठी |
| लाच स्विकृती ठिकाण | :- | पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर |

**तक्रारीचे थोडक्यात स्वरुप :-** यातील यांच्या विरुद्ध दाखल गुन्ह्यात पोलीस ठाण्यात जामीन देऊन, तक्रारदार यांचा मोबाईल फोन परत देण्यासाठी व गुन्ह्यात मदत करण्यासाठी सुभाष भोसले, सहा. पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर यांनी तक्रारदार यांच्याकडे ४०००/- रु लाचेची मागणी केली होती. तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद येथे तक्रार दिली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने सुभाष भोसले, सहा. पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर यांची लाचेच्या मागणीची शहानिशा केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे ४०००/- रुपये लाचेची मागणी करून, सदर लाचेची रक्कम पंच क्रमांक १ यांच्याकडे देऊन, त्यांच्या मार्फतीने स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले.

त्यावरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,औरंगाबाद तर्फे आज दिनांक २९/०२/२०२० रोजी सापळा आयोजीत केला असता, सुभाष छगनराव भोसले, वय ५५ वर्षे, सहा. पोलीस उपनिरीक्षक, पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर यांनी पंच क्र. १ यांच्याकडुन ४०००/- रुपये लाचेची रक्कम वर नमुद ठिकाणी स्विकारल्यानंतर त्यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांच्याविरुद्ध पोलीस ठाणे सातारा, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई ही लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद चे पोलीस अधिक्षक मा. श्री. अरविंद चावरीया, अपर पोलीस अधिक्षक मा. डॉ. अनिता जमादार, पोलीस उपअधीक्षक श्री. बी. व्ही. गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपअधीक्षक श्री. मारुती पंडित यांनी केली आहे. त्यांना पोना रवींद्र देशमुख, बाळासाहेब राठोड, संदीप आव्हाळे, पोशि प्रकाश घुगरे, विलास चव्हाण, सी. एन. बागुल यांनी मदत केली आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद यांनी केले आहे.**

**फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४**

**EMail ID** :-1) sp1acbaurangabad@gmail.com, 2) spacbaurangabad@mahapolice.gov.in

29/2/2020

**(मारुती शंकर पंडित)**
**पोलीस उप अधीक्षक**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,**
**औरंगाबाद.**